**<u>नियमित दिवाणी दावा क.४३०/२०१२ मध्ये नि.५७ वरील आदेश</u>**
( हणमंत वि. विठ्ठल )

वादीने सदरचा अर्ज आदेश १ नियम १० दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे दाखल केला आहे. वादीने सदर अर्जान्वये असे कथन केले आहे की, सदरचा दावा वाटणी होवून वेगळा ताबा मिळणेकामी दाखल केला आहे. परंतु दावा चालू असताना वादीला त्याच्या हिश्यापासून वंचित ठेवण्याच्या हेतुने दि.१४/५/२०१२ रोजी प्रतिवादी क्र.६ ने वादग्रस्त मिळकतीपैकी मौजे सेलु, ता. औसा येथील गट नं.२६८ मधील ४० गुंठे जमीन सुनील किसन पचभाई यांना विक्री केली आहे. त्यानंतर, सुनील पचभाई यांनी सदर जमीन निवृत्ती विठ्ठल बडगिरे यांना दि.१०/४/२०१३ रोजी खरेदीखताआधारे विनाताबा विक्री केली आहे. वादी अशिक्षीत असून वादीला सदर बाब नंतर समजली. वादीने सदर अर्जान्वये दोन्ही खरेदीदार सुनील पचभाई व निवृत्ती बडगिरे यांना दाव्यात समाविष्ट करण्याची विनंती केली आहे.

२. प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दाखल करून अर्जास प्रखर विरोध केला आहे. त्यांनी असे प्रतिपादन केले आहे की, सदरचा अर्ज कायद्यास धरून नाही तसेच वादीने केवळ दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे अर्ज दाखल केला आहे, परंतु दाव्यामध्ये त्याप्रमाणे आदेश ६ नियम १७ प्रमाणे बदल करण्याची परवानगी मागितलेली नाही. वादग्रस्त जमिनीची पुर्वीच तोंडी वाटणी झाली आहे. तेव्हा सदरचा अर्ज कायदेशीर नसून तो खारीज करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

३. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अर्जाचे व त्यावरील म्हणणे याचा अवलोकन केले. सदरचा दावा दि.०९/८/२०१२ रोजी वादीने दाखल केला आहे. परंतु वादग्रस्त जागेचे खरेदीखत वादीच्या म्हणण्यानुसार दि.१४/५/२०१२ रोजी झाले आहे व दुसरे खरेदीखत दि. १०/४/२०१३ रोजी झाले आहे. दि.१४/५/२०१२ रोजीचे खरेदीखत हे दावा दाखल करण्याच्या पुर्वीच झालेले आहे. परंतु निश्चीतच केवळ या एका मुद्यावर वादीचा अर्ज नामंजूर करता येणार नाही. सदरचा दावा वाटणी होवून वेगळा ताबा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. निश्चीतच वादी सदर दादीस पात्र आहे हे वादीला योग्य त्या पुराव्याने सिध्द करावे लागेल. वादीने आज रोजी सदर अर्जान्वये दोन्ही खरेदीदार यांना दाव्यात समाविष्ट करून घेण्याची

विनंती केली आहे. पुढील निर्माण गुंतागुंत टाळण्यासाठी वादीचा अर्ज मंजूर आवश्यक वाटते. तसेच सदरचा अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. करीता, सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो, व खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. सदरचा अर्ज रू.५००/— (रूपये पाचशे फक्त) खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. सुनील पचभाई व निवृत्ती बडगिरे यांना सदर दाव्यात प्रतिवादी क्र.७ आणि ८ म्हणून समाविष्ट करण्यात येते.

३. वादीने दाव्यात योग्य ती सुधारणा करून, सुधारीत वादपत्र सदर आदेशापासून १४ दिवसाच्या आत दाखल करावा.

( जे. पी. सरपाते )

दि.२२/०७/२०१६ २रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, औसा.